D:\sharad\sanad.doc

जा.क्र.जिउकेंज/आस्था/सनद/२०११/३४८५
महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव
यांचे कार्यालय,आयटीआयजवळ, जळगांव.
दिनांक १९/१०/२०११

प्रति,
मा.जिल्हा सुचना व माहिती अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, जळगांव.

विषय - शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियम आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम-२००५ मधील कलम-९ (१) नुसार प्रधान केलेल्या अधिकाराची तपशिलवार यादी पाठविणेबाबत.
नागरिकांची सनद

DIO
NIC

महोदय,

जिल्हा उद्योग केंद्रातर्फे राबविण्यात येणा-या योजनाबाबत सविस्तर माहिती बाबतची नागरीकांच्या सनद (सीडीसह) सोबत जळगांव जिल्हयाच्या बेवसाईटवर प्रसारीत करणेसाठी सादर करण्यात येत आहे.

आपला विश्वासु,

महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव

सोबत-वरीलप्रमाणे

19/10

D:\sharad\sanad.doc

महाराष्ट्र शासन

## उद्योग संचालनालय मुंबई

## जिल्हा उद्योग केंद्र जळगांव

## सुशिक्षित बेरोजगार व उद्योजकांच्या मार्गदर्शन व मदतीसाठी

# नागरीकांची सनद

श्री.एस.व्ही.पाटील
महाव्यवस्थापक
जिल्हा उद्योग केंद्र, आयटीआयजवळ
जळगांव
दुरध्वनी क्र. ०२५७/२२५२८३२/२२५५२६०
ई मेल आयडी – didicjalgaon@maharashtra.gov.in
gmdic_jal@dataone.in

**१) उपक्रम विकास अधिनियम – २००६,** १ ऑक्टोबर २००६ पासून अस्तित्वात आला. त्यानुसार सुक्ष्म, लघु व मध्यम उत्पादक उपक्रम व सेवा उपक्रमांची नोंदणी जिल्हा उद्योग केंद्राकडे करण्यात येते.

यंत्रसामुग्रीमधील गुंतवणुकीनुसार उत्पादक उपक्रमांचे (manufacturing enterprises) वर्गीकरण खालीप्रमाणे करण्यात येते.

१. सुक्ष्म उत्पादक उपक्रम - रु. २५ लक्ष पर्यंत
२. रु.२५ लक्ष पेक्षा जास्त व रु.५०० लक्ष पर्यंत
३. रु.५०० लक्ष पेक्षा जास्त व रु.१००० लक्ष पर्यंत

रु.१००० लक्ष पेक्षा जास्त गुंतवणुक असलेले उपक्रम मोठे उत्पादक उपक्रम म्हणून समजले जातात व त्याची नोंदणी केंद्र शासनाकडे केली जाते.

सयंत्रांमधील (plant and equipment) मधील गुंतवणुकीनुसार सेवा उपक्रमांचे (service enterprises) वर्गीकरण खालीलप्रमाणे करण्यात येते.

१. सुक्ष्म सेवा उपक्रम - रु.१० लक्ष पर्यंत
२. लघु सेवा उपक्रम - रु.१० लक्ष पेक्षा जास्त व रु.२०० लक्ष पर्यंत
३. मध्यम सेवा उपक्रम - रु.२०० लक्ष पेक्षा जास्त व रु.५०० लक्ष पर्यंत.

**२) सामुहिक प्रोत्साहन योजना - २००७**

औद्योगिक दृष्टया अविकसीत व विकसनशील भागात मोठया प्रमाणात औद्योगिक गुंतवणुक व्हावी या उद्येशाने महाराष्ट्र शासनाने १ एप्रिल २००१ ते ३१ मार्च २०११ या कालावधीसाठी सुरु केलेली साप्रोयो २००७ योजना. सदर योजनेस दि. ३० नोव्हेंबर २०११ मुदतवाढ मिळालेली आहे.

जळगांव जिल्हयातील तालुक्यांची झोननिहाय वर्गवारी

| | | |
|---|---|---|
| झोन ड | जळगांव, यावल, चाळीसगांव, अमळनेर व धरणगांव | कमी विकसीत विभाग |
| झोन ड + | चोपडा, रावेर, मुक्ताईनगर, भुसावळ, जामनेर, पाचोरा, भडगांव, पारोळा, एरंडोल व बोदवड | आधारभुत सुविधांचा अभाव |

ड व ड + झोनमधील उद्योग घटक खालीलप्रमाणे सवलतीस पात्र

| | | |
|---|---|---|
| औद्योगिक प्रोत्साहन अनुदान (आयपीएस) | ड | ड + |
| सुक्ष्म, लघु उद्योग घटकांच्या स्थिर भांडवली गुंतवणुकीवर | ४० टक्के | ५० टक्के |
| कालावधी | ८ वर्षे | ९ वर्षे |
| मध्यम व मोठे उद्योग घटकांच्या स्थिर भांडवली गुंतवणूकीवर | २५ टक्के | ३५ टक्के |

महाराष्ट्र शासन व त्यांचे इतर विभाग/यंत्रणा यांना दरवर्षी उद्योग घटकाने अदा केलेल्या कराच्या २५ टक्के रक्कम अनुदान म्हणुन पुढील आर्थिक वर्षात उद्योग घटकास वाटप केले जाते.

नवीन वस्त्रोद्योग, होजाअरी व निटवेअर लघु उद्योग घटकांना ५ टक्के व्याज अनुदान ड विभागासाठी २० लाख ५ वर्षाकरिता व ड + विभागासाठी २५ लाख ६ वर्षापर्यंत

जकात करात १०० टक्के कर परतावा ड विभागासाठी ९ वर्षे व ड + १२ वर्षे

विद्युत शुल्क १०० टक्के माफी १५ वर्षे पर्यंत

नवीन उद्योग व उद्योगाचे विस्तारीकरण करणा-या उद्योगांना जागा व कर्ज संपादनासाठी कराव्या लागणा-या विविध मुद्रांक शुल्क माफी सवलत

## ३) पंतप्रधान रोजगार निर्मीती कार्यक्रम (PMEGP)

**उद्देश :-**

१) देशभर नवीन सुक्ष्म उद्योग/उपक्रम स्थापित करुन ग्रामीण व शहरी भागात रोजगार निर्मीती करणे असा योजनेचा मुख्य उद्देश आहे.
२) ही योजना संपुर्ण राज्यात जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्रामोद्योग मंडळ व खादी ग्रामोद्योग आयोग आणि राष्ट्रीयकृत बँकेमार्फत राबविली जाते. सदर योजना रोजगार निर्मीतीशी निगडीत आहे.

**योजनेची वैशिष्टे –**

१) अर्थसहाय्य व अनुदान
२) उद्योगासाठी प्रकल्प मर्यादा रु.२५ लाखापर्यंत व सेवा उपक्रमाकरीता रु.१० लाखापर्यंत.

| | लाभार्थी प्रवर्ग | लाभार्थी सहभाग प्रकल्प किंमतीच्या | अनुदानाचा दर प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात | |
|---|---|---|---|---|
| अ | क्षेत्र | -- | शहरी | ग्रामीण |
| ब | सामान्य प्रवर्ग | १० टक्के | १५ टक्के | २५ टक्के |
| क | विशेष प्रवर्ग (अ.जा.,अ.ज., इमाव,अल्पसंख्याक,महिला, माजी सैनिक व अपंग) | ५ टक्के | २५ टक्के | ३५ टक्के |

३) सामान्य प्रवर्गातील अर्जदारास प्रकल्प किंमतीच्या ९० टक्के बँक आर्थिक मदत देईल व विशेष प्रवर्गातील अर्जदारास ९५ टक्के आर्थिक मदत मंजुर करेल.
४) रिझर्व बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार व्याजाचे दर आकारण्यात येईल.
५) कर्जाची परतफेड ३ ते ७ वर्षाचे आंत करावयाची आहे.
६) रु.५ लाखाचे वरील प्रकल्पात गहाण व जमानतदार आवश्यक आहे.
७) कर्ज वाटपानंतर ३ वर्षाचे आत उद्योग बंद झाल्यास अनुदानास अपात्र ठरतील.

**पात्रतेच्या अटी –**
१) उमेदवाराचे वय १८ वर्षाचे वर
२) उत्पनाची मर्यादा नाही.
३) सहकारी संस्था (नोंदणीकृत), स्वयंसहाय्यता समुह यांनाही लाभ घेता येतो.
४) फक्त नवीन प्रकल्पासाठी अर्थसहाय्य उपलब्ध करण्यात येईल.
५) उद्योगाचे बाबतीत प्रकल्प रु.१० लाखाचे वर सेवा क्षेत्रातील उपक्रमाचे बाबतीत प्रकल्प रु.५ लाखाचे वर असल्यास उमेदवार कमीत कमी ८ वी पास.

## ४) सुधारीत बीजभांडवल योजना -

**उद्देश :-**

१) सुशिक्षीत बेरोजगार युवकांना उद्योग व सेवा व्यापार उपक्रमात रोजगार उपलब्ध करुन देणारी शासनाची योजना.
२) ही योजना संपुर्ण राज्यात जिल्हा उद्योग केंद्र व बॅकेमार्फत राबविली जाते.
३) सुशिक्षीत बेरोजगारांना मार्जीन उभे करण्याकरीता बीजभांडवल उपलब्ध करुन देण्यात येते.

**योजनेची वैशिष्टे –**
१) उद्योग, सेवा व व्यापार या व्यवसायातील प्रकल्प मर्यादा रु.२५ लाखापर्यंत.
२) रु.१० लाखावरील प्रकल्पास बँकेने मंजूर केलेल्या प्रकल्पाच्या १५ टक्के प्रमाणे अथवा जास्तीत जास्त रु.३.७५ लाख एवढे बीजभांडवल देण्यात येते.

३) रु.१० लाखापेक्षा कमी प्रकल्पास खालीलप्रमाणे बीजभांडवल देण्यात येते.
   अ) सर्व साधारण प्रवर्गाकरीता १५ टक्के
   ब) अनु.जाती/जमाती/अपंग/विमुक्त व भटक्या जाती आणि इतर मागास वर्गाकरीता २० टक्के.
४) बीजभांडवलाची रक्कम मृदु कर्ज (सॉप्ट लोन) म्हणून दरसाल ६ टक्के व्याजाने देण्यात येते.
५) बीजभांडवलाची कर्जाची परतफेड विहीत करण्यात आली नाही तर थकीत रकमेवर दरसाल १ टक्के दंडनीय व्याज आकारण्यात येते.
६) बीजभांडवल कर्जाची परतफेड नियमीत विहीत कालावधीत केल्यास व्याजात ३ टक्के सवलत देण्यात येते.
७) बीजभांडवली कर्जाची परतफेड ७ वर्षात व त्यामध्ये ३ वर्षाचा विलंबावधी समाविष्ट आहे. (वाहतूक व्यवसायासाठी व व्यापार व सेवा उद्योगासाठी विलंबावधी सहा महिन्याचा राहील)
८) नियमीत कर्ज परतफेड करणा-या लाभार्थीना व्याजदरात ३ टक्के सुट मिळेल.

<u>पात्रता</u> –

१) अर्जदाराची शैक्षणिक पात्रता किमान ७ वी पास.
२) अर्जदार बेरोजगार असावा जर अर्जदार नोकरीत असेल तर बीजभांडवलाचे वितरणापुर्वी त्याने राजीनामा देणे आवश्यक आहे.
३) काही विशिष्ठ प्रकरणांत शैक्षणिक पात्रता शिथिल करण्यात येवू शकते.
४) अर्जदार स्थानिक रहिवासी असणे आवश्यक आहे. (अर्जदाराचा महाराष्ट्रातील वास्तव कमीत कमी १५ वर्ष असावे)
५) बीजभांडवलाचे वाटप करण्यापुर्वी जिल्हा उद्योग केंद्राच्या नांवे दुय्यम अधिभार नोंदविण्यात येतो.
६) बीजभांडवल गैरवापर केल्यास किंवा योजनेच्या अटी व शर्तीचा भंग केल्यास बीजभांडवल व्याज व २ टक्के दंडव्याजासह एकरकमी परत घेण्यात येते.

**५) <u>जिल्हा उद्योग केंद्र योजना</u> -**

**<u>उद्देश</u> :-**

ग्रामीण कारागिरांना सुक्ष्म उद्योग सुरु करण्यासाठी अर्थसहाय्य करणे.

<u>पात्रता</u> –

१) शिक्षणाची व वयाची अट नाही.
२) उद्योग व सेवा उद्योग नोंदणीस पात्र असावा.

३) उद्योगामधील यंत्र सामुग्रीची गुंतवणूक रु. २ लाखाचे आंत असावी.
४) उद्योग कमाल १ लाख लोकवस्ती असणा-या गावामध्ये सुरु करता येते.
५) चालु उद्योगाचा विस्तार करण्यासाठीही या योजनेचा लाभ घेता येतो.

**वैशिष्टे –**

१) प्रकल्प किंमतीच्या ६५ ते ७५ टक्के बँक कर्ज.
२) स्वत:चे भांडवल ५ टक्के.
३) बीजभांडवल परतफेड कालावधी ७ वर्ष.
४) बीजभांडवलावर व्याज दर ४ टक्के द.सा.द.शे.
५) सर्वसाधारण प्रवर्गासाठी २० टक्के बीजभांडवल कमाल रु.४००००/-
अनु.जाती/जमाती करीता ३० टक्के बीजभांडवल कमाल रु.६००००/-

**६) उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम -**

सुशिक्षित बेरोजगारांना स्वयंरोजगारासाठी प्रवृत्त करण्याच्या दृष्टीने उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जातो. सदर प्रशिक्षण कार्यक्रमात मार्गदर्शन व प्रशिक्षण शिबीरे घेतली जातात. प्रशिक्षणाचा कालावधी १ दिवस ते २ महिने इतका असतो. प्रशिक्षणामध्ये व्यवसाय निवडणे, प्रकल्प अहवाल तयार करणे, बाजारपेठेबाबत माहिती, आवश्यक परवाने इ.माहिती दिली जाते. प्रशिक्षण कार्यक्रम महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र व मिटकॉन इ.संस्थाद्वारे घेण्यात येतात. खालीलपमाणे कार्यक्रम राबविले जातात.

१) उद्योजकता परिचय कार्यक्रम – १ दिवसीय अनिवासी
२) उद्योजकता परिचय कार्यक्रम – १२ दिवसीय अनिवासी
३) तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम – १५ दिवस ते २ महिने अनिवासी.

या योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेणा-या बेरोजगारांना प्रतिमाह रु.१०००/- इतके विद्यावेतन देण्यात येते.

**उद्योग संचालनालय**
**जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव**
**नागरिकांची सनद**

| अ.क्र. | कार्यालयाकडून पुरविली जाणारी सेवा | विहीत नमुन्यातील अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे | कार्यवाही कालावधी | मार्गदर्शन करणारे अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | सुक्ष्म/लघु/मध्यम उत्पादन/सेवा उपक्रमाचे ज्ञापन | **अर्ज विहीत नमुन्यात (भाग १, भाग २)**<br>१.भागीदारी/कंपनी/सहकारी संस्था असल्यास भागीदारी पत्र व नोंदणी/कंपनी/संस्था नोंदणी पत्र व नियमपत्र,<br>२.स्थानिक रोजगाराबाबत प्रपत्र<br>३.एमआयडीसीमध्ये उद्योग असल्यास भुखंड ताबा पावती. | अर्ज पोस्टोन आल्यास ५ दिवस अथवा १ दिवस | महाव्यवस्थापक/व्यवस्थापक /उद्योग निरीक्षक |
| २ | माहिती/जैव तंत्रज्ञान इरादापत्र/नोंदणी | **अर्ज विहीत नमुन्यात**<br>१. प्रतिज्ञापत्रासह,<br>२. स्थालोरो अर्ज<br>३. आयटी हार्डवेअर/सॉफटवेअरबाबत<br>४. स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाहरकत प्रमाणपत्र | १ दिवस | महाव्यवस्थापक/व्यवस्थापक /उद्योग निरीक्षक |
| ३ | मुंद्रांक शुल्क सवलत प्रमाणपत्र | **अर्ज विहीत नमुन्यात**<br>१.स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाहकरत प्रमाणपत्र<br>२.सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम नोंदणी<br>३.जागा खरेदी/भाडे करार पत्र<br>४.बीगर शेती परवाना नसल्यास नगररचना कार्यालयाचा झोनींग दाखला<br>५.विहीत नमुन्यातील शपथपत्र | ३ दिवस | महाव्यवस्थापक/व्यवस्थापक /उद्योग निरीक्षक |
| ४ | उद्योग घटकासाठी सामुहिक प्रोत्साहन योजना | **अर्ज विहीत नमुन्यात**<br>१.स्थायी/अस्थायी सुक्ष्म/ लघु उपक्रम ज्ञापन<br>२.सनदी लेखापाल यांचे प्रकल्प मुल्याकंन अहवाल प्रपत्र २,३ व ४ नुसार<br>३.उद्योग उभारणीसाठी वित्तीय संस्थेकडून कर्ज घेतल्यास त्याचे प्रकल्प मुल्याकंन अहवाल विहीत प्रपत्र<br>४.उद्योगाची जागा/इमारत स्वतःची असल्यास नोंदणीकृत खरेदीपत्र/प्रापर्टी कार्ड/सातबारा उतारा/भाडे तत्वावर असल्यास नोंदणीकृत भाडेकरार नामा/उद्योग औद्योगिक विकास महामंडळाच्या क्षेत्रात असल्यास ताबा पावती<br>५.मंजूर आराखडा असल्यास सनदी वास्तु विशारद यांचे परिशिष्ट १ मधील प्रमाणपत्र | ३० दिवस | महाव्यवस्थापक/व्यवस्थापक /उद्योग निरीक्षक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ६.स्वनिर्मीत यंत्रसामुग्री असल्यास सनदी अभियंत्याचे मुल्यांकन प्रमाणपत्र व आयुष्य नमुद प्रमाणपत्र,<br>७.उत्पादन/प्रक्रियासाठी विद्युत अश्वशक्ती आवश्यक असल्यास विद्युत मंजुरी/जोडणी पत्र व प्रथम देयक,<br>८ कच्चा माल/विक्री देयके व १५ दिवसाचा उत्पादन अहवाल,<br>९.महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे उत्पादर सुरु करण्यासाठी परवाना पत्र/नाहरकत दाखला, विहीत नमुन्यातील शपथपत्र | | |
| ५ | वंगणतेल प्रमाणपत्र अनुज्ञाप्ती | **अर्ज विहीत नमुन्यात**<br>१.शासकीय फी रु.२५ भरलेल्या चलनाची प्रत<br>२.वंगणतेल अधिकृत कंपनीचे पुरवठासंबंधी प्राधिकार प्रत<br>३.स्थानिक स्वराज्य संस्थेचे नाहकरत प्रमाणपत्र<br>४.जागेबाबत पुरावा. | १ दिवस | महाव्यवस्थापक/व्यवस्थापक /उद्योग निरीक्षक |
| ६ | पंतप्रधार रोजगार निर्मीती योजना | **अर्ज विहीत नमुन्यात**,<br>१. किमान आठवी पास गुणपत्रक<br>२. शाळा सोडल्याचा दाखला,<br>३. सेवा योजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र,<br>४. रेशन कार्ड,<br>५. जागेचा उतारा,<br>६. दरपत्रक,<br>७.मतदान नोंदणी ओळखपत्र,<br>८. विहीत नमुन्यात शपथपत्र,<br>९. प्रकल्प अहवाल | १५ दिवस | महाव्यवस्थापक/व्यवस्थापक /उद्योग निरीक्षक |
| ७ | सुशिक्षित बेरोजगारासाठी बीज भांडवल योजना आणि जिल्हा उद्योग केंद्राकडील ग्रामीण उद्योजकांना कर्ज योजना | **अर्ज विहीत नमुन्यात**,<br>१.किमान आठवी पास गुणपत्रक व शाळा सोडल्याचा दाखला,<br>२.सेवा योजन कार्यालयाचे नोंदणी प्रमाणपत्र,.<br>३. रेशन कार्ड,<br>४. जागेचा उतारा,<br>५. दरपत्रक,<br>६.मतदान नोंदणी ओळखपत्र,<br>७.विहीत नमुन्यात शपथपत्र,<br>८.प्रकल्प अहवाल,<br>९.कर्ज प्रकरण मंजुर झाल्यास बँकेचे कर्ज मंजुरीपत्र,<br>१०.दुय्यम तारण गहाणखत मुद्रांकित करुन आगावू पोचपावती | १५ दिवस<br><br>१५ दिवस | महाव्यवस्थापक/व्यवस्थापक /उद्योग निरीक्षक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | मध्यवर्ती भांडार खरेदी संघटना नोंदणी | **अर्ज विहीत नमुन्यातील**<br>१. जागेबाबत कागदपत्र<br>२.मागील ३ वर्षाचे ताळेबंद प्रत<br>३.आयकर भरल्याचे प्रमाणपत्र<br>४.बँकेचे खाते समाधानकारण असल्याबाबतचे प्रमाणपत्र | १५ दिवस | महाव्यवस्थापक/व्यवस्थापक /उद्योग निरीक्षक |
| ९ | कच्चा माल शिफारस | **अर्ज विहीत नमुन्यात**<br>१.प्रतिज्ञापत्र<br>२.ज्ञापन प्रत<br>३.सनदी लेखापाल यांचे कच्चा माल विनियोगा बाबत प्रमाणपत्र | ७ दिवस | महाव्यवस्थापक/व्यवस्थापक /उद्योग निरीक्षक |

| सेवा पुरविणारे अधिकारी/कर्मचारी | सेवा विहित कालावधीत पुरविली न गेल्यास ज्यांच्याकडे तक्रार करता येईल त्यांचा पत्ता |
|---|---|
| श्री.एस.व्ही.पाटील, महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव<br>दुरध्वनी क्रमांक ०२५७/२२५२८३२/२२५५२६०<br>ई मेल आयडी – didicjalgaon@maharashtra.gov.in<br>gmdic_jal@dataone.in | श्री.पी.पी.दाबेराव, उद्योग सह संचालक, नाशिक विभाग, नाशिक आयटीआयजवळ, सातपुर, नाशिक-<br>दुरध्वनी क्रमांक – ०२५३/२३५००८७<br>ई मेल आयडी – dironashik@maharashtra.gov.in |

शि वि पाटील

महाव्यवस्थापक,
जिल्हा उद्योग केंद्र, जळगांव.